**दिनांक : ०८/११/२०१९**

# खरेदी समितीचे इतिवृत्त

यशदातील छपाई आणि इतर अनुषंगिक कामे सन २०१९-२०२१ या कालावधीसाठी (Printing of book/booklets/ training material etc. for the year 2019-2021) या कामासाठी दिनांक ०२/११/२०१९ ते १६/११/२०१९ या कालावधीमध्ये फेर ई निविदा –मागविण्यात आल्या आहेत.

२. सदरच्या ई-निविदेबाबतची –निविदापूर्व बैठक (Pre-Bid Meeting) दिनांक ०७/११/२०१९ रोजी दुपारी ०३.०० वाजता यशदातआयोजित करण्यात आली होती या बैठकीला खालील नमूद करण्यात आल्यानुसार यशदाचे प्रतिनिधी तसेच निविदादार/प्रतिनिधी उपस्थित होते.

| अ. क्र. | बैठकीसाठी उपस्थित असलेले यशदाचे प्रतिनिधी |
|---|---|
| ०१ | श्री सतिश तडकसे, वित्तिय सल्लागार |
| ०२ | श्री. सदाशिव पाटील, निबंधक |
| ०३ | श्री. देवराम शेळके, लेखाधिकारी तथा प्रमुख प्रापण |
| ०४ | श्री. विकास कटकधोंड, सहायक निबंधक |
| ०५ | डॉ. बबन जोगदंड, संशोधन अधिकारी, (प्रकाशन) |
| | **निविदादार/प्रतिनिधी** |
| ०१ | श्री. रघुवेंद्र के. कुलकर्णी, प्रिंटर्स एक्सप्रेस, एअरपोर्ट रोड, पुणे |
| ०२ | श्री. विवेक आर. गडम, समर्थ ऑफसेट, कर्वेनगर, पुणे |
| ०३ | श्री. दीपक ढोलेपाटील, शिवानी प्रिंटर्स, पुणे |
| ०४ | श्री. सी . डी. जोशी, श्री जे. प्रिंटर्स, पुणे |

०३ सदर बैठकीमध्ये निविदाधारकांकडून काही मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. त्याबाबत खालीलप्रमाणे बैठकीत सर्वानुमते निर्णय घेण्यात आले

| अ. क्र. | निविदादारांनी उपस्थित केलेले मुद्दे | खरेदी समिती कडून घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १ | पेपरची नियमित भाव वाढ होत असते तेव्हा त्या-त्या दरानुसार पेपरचे पैसे लावावेत | असे करता येणार नाही. पुढील भाववाढ विचारात घेता त्या प्रमाणे दर भरावेत. |
| २ | पुणे व पिंपरी-चिंचवड, मनपा हद्दीबाबत | निविदेमधील ANNEXURE-A, Sr. No. 04 Location of the Press या अटीमध्ये बदल करण्यात येत असून, सुधारित अट पुढील प्रमाणे राहील. "निविदाकारांची प्रिटिंग प्रेस ही पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (PMRDA) हद्दीमध्ये यशदापासून २५ किलोमीटर आत असावी." |
| ३ | CTP च्या उपलब्धतेबाबत | CTP ची सुविधा निविदादारांकडे असावी, नसल्यास, CTP सुविधा असणा-या छपाईधारकाकडून CTP ची कामे करुन देण्यास तयार असल्याबाबतचे हमी पत्र निविदादारांनी तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावे. तसे हमी पत्र सादर केल्यास ते ग्राह्य धरले जाईल. |
| ४ | छपाईचे काम झाल्यावर देयके किती दिवसात मिळतील ? | छपाईचे काम झाल्यानंतर, परिपूर्ण देयके सादर केल्यानंतर. देयके १० ते १५ दिवसांत (कार्यालयीन कामाकाजाचे) अदा केली जातात. |
| ५ | निविदापुर्व बैठकीसाठी उपस्थित असलेल्या निविदादारांकडुन BoQ भरण्याबाबत मार्गदर्शन करण्यास | यशदातील "Reprographics & Printing Works 2019-2021" याबाबतच्या ई- निविदा भरताना निविदेमधील Excel Sheet BoQ मधील दरांच्या रकमा भरताना १६९ पेक्षा जास्त रकाने उपलब्ध आहेत. सदरच्या |

| | | |
|---|---|---|
| | विनंती करण्यात आली. | रकमा Excel Sheet मध्ये online भरताना निविदादारांना अनेक अडचणीना तोंड दयावे लागेल. त्यामुळे निविदादारांकडुन ई-निविदा सादर करण्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. सदरची बाब लक्षात घेवुन निविदादारांना निविदेतील दर भरणे अधिक सुलभ करण्यासाठी PDF BoQ मध्ये निविदेचे दर सादर करण्याची सुविधा देण्यात आली आहे. या सोबत प्रणालीची अनिवार्यता लक्षात घेता Excel Sheet BoQ मध्ये तीन बाबी नमुद करण्यात येवुन Excel Sheet BoQ सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. निविदादारांनी Excel Sheet BoQ व PDF BoQ या दोन्हीही BoQ सादर करणे अनिवार्य आहे. Excel Sheet BoQ मध्ये नमुद करण्यात आलेल्या तीन बाबींच्या आधारे कुठल्याही निविदादारांची निविदा अंतीम करण्यात येणार नाही. तुलनात्म्क तक्ता (Comparative Statement) तयार करण्यासाठी व न्युनतम निविदादार ठरविण्यासाठी फक्त PDF BoQ नमुन्याचाच विचार करण्यात येईल. BOQ PDF वर फर्मचा सही शिक्का असावा. तसेच निविदा अटी व शर्तीनुसार न्युनतम ठरणा-या निविदादारास अन्य निविदादारांचे इतर बाबींचे न्युनतम दर स्विकारणे बंधनकारक राहील. सदरच्या निविदापुर्व बैठकीसाठी उपस्थित असलेल्या निविदादारांकडुन उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने केलेल्या खुलाशाशिवाय मुळ ई-निविदेतील इतर अटी व शर्ती कायम राहाणार असल्याचे सर्व निविदादारांना स्पष्ट करण्यात आले व सर्वांनी निविदा काळजीपूर्वक वाचून सादर कराव्यात व यशस्वी BID सादर करावे असे सूचविण्यात आले. |

०४ सदरचे इतिवृत्त यशदातील छपाई आणि इतर अनुषंगिक काम सन २०१९-२०२१ या कालावधीसाठी (Printing of books/booklets/training material etc. for the year 2019-2021) या कामासाठीच्या ई-निविदा अटी-शर्तींचा भाग राहील.

(संशोधन अधिकारी, प्रकाशन) (प्रमुख, प्रापण) (निबंधक) (वित्तीय सल्लागार)